RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

# लेवा जगत

संपादक : शाम वसंत पाटील

Book - Post Parvana(Subs.5000)/L-218/RNP-BH-91/2023-2025

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :-
साप्ताहिक लेवा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२

पान-१ ■ वर्ष : १९ ■ अंक : ४२ ■ रविवार , २७ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत-१०/-रु.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंतिम मुदत १० ऑगस्टपर्यंत- - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



मुंबई, दि. ०१ : राज्यातील शेतकरी बांधवांकडून प्रधानमंत्री पीक विमा योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी नोंदणी केली आहे. अद्याप काही शेतकरी तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता अथवा इतर वैयक्तिक कारणांमुळे अर्ज दाखल करू शकलेले नाहीत. या बाबींचा विचार करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ वरून १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

# नागरिकांना विनाकारण चकरा मारायला लावू नका; कामे तात्काळ करा : आमदार अमोल जावळे



फैजपूर प्रतिनिधी

फैजपूर शहरातील शुभ दिव्य मंगल कार्यालयात गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या महाराजस्व अभियान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात विविध शासकीय दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार अमोल जावळे यांनी अधिकाऱ्यांना नागरिकांची कामे वेळेत आणि विनाकारण हेलपाटे न घालता पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार जावळे म्हणाले की, शासनाचा उद्देश नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा घराजवळ उपलब्ध करून देण्याचा असून, विविध दाखल्यांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत. विशेषत: भूमी अभिलेख विभागाने नागरिकांना कोणताही त्रास न देता त्यांच्या अर्जांवरील कामे तातडीने पूर्ण करावीत. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना कटू प्रसंगाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

शिबिरात विविध प्रकारचे दाखले लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. कार्यक्रमास आमदार नंदकिशोर महाजन, नगराध्यक्षा दामिनी सराफ, बबनराव काकडे, उपनगराध्यक्ष पप्पू चौधरी, प्रांत अधिकारी मोहनमाला नाझीरकर, हिरालाल चौधरी, विलास चौधरी, सुरेश धनके, डॉ. कुंदन फेगडे, हर्षल पाटील, प्रभाकर सोनवणे, सिद्धेश्वर वाघुळदे, सुनीता नेहेते यांच्यासह नगरसेवक, मंडळ अधिकारी, तलाठी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र राजपूत यांनी केले.

शिबिराला प्रचंड गर्दी

महाराजस्व अभियान शिबिरासाठी शुभ दिव्य मंगल कार्यालयात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली. सभागृह पूर्ण भरल्याने पार्किंग परिसरातही नागरिकांची मोठी उपस्थिती दिसून आली. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणातील कार्यक्रम बंदिस्त सभागृहाऐवजी मोकळ्या मैदानात आयोजित करायला हवा होता, अशी चर्चा उपस्थित नागरिकांमध्ये रंगली.

## सुकी नदीवरील पुलावरून पाणी; रावेर मार्ग दुसऱ्या दिवशीही बंद

सावखेडा प्रतिनिधी : रावेर तालुक्यातील सावखेडा परिसरासह डोंगराळ भागात मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गारबर्डी धरण ओव्हरफ्लो झाले असून, कुंभारखेडा-उटखेडा मार्गावरील सुकी नदीच्या पुलावरून रविवारीही वेगाने पाणी वाहत असल्याने रावेरकडे जाणारा मार्ग सलग दुसऱ्या दिवशीही वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

या मार्गावरून सावखेडा, खिरोदा, लोहारा, गौरखेडा, कुंभारखेडा आदी गावांतील नागरिकांची रावेरकडे मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असते. मात्र पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहनधारकांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागत असून वेळ व इंधनाचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी तसेच नोकरदारांनाही याचा मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, सुकी नदीच्या पुलावरील पुराचे रौद्र रूप पाहण्यासाठी परिसरातील नागरिक आणि लहान मुलांनी मोठी गर्दी केली. पुलावरून वेगाने वाहणारे पाणी पाहण्यासाठी अनेकजण थांबत असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित अंतर राखण्याचे तसेच पुलावरून पाणी वाहत असताना नदी किंवा पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन केले आहे.

संततधार पावसामुळे परिसरातील नाले, ओढे आणि नद्यांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली असून, पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरवर्षी पावसाळ्यात सुकी नदीवरील हा पूल पाण्याखाली जात असल्याने वाहतूक ठप्प होते आणि अनेक गावांचा संपर्क तुटतो.

## भुसावळ येथे महिला आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



### जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त शेकडो महिलांनी घेतला लाभ

भुसावळ (प्रतिनिधी) : जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि श्री संत गाडगे महाराज नगरपालिका रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष महिला आरोग्य शिबिराला पहिल्याच दिवशी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने महिलांनी आरोग्य तपासणी करून तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घेतले.

शिबिराचे उद्घाटन प्रभारी नगराध्यक्षा शैलजा नारखेडे, सामाजिक कार्यकर्त्या रजनी सावकारे, आरोग्य सभापती मेघा वाणी, वैद्यकीय अधिकारी संदीप जैन आणि तौसिफ खान यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी प्रसूती व स्त्रीरोग विभागातील तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात गर्भाशयाशी संबंधित आजार, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता, स्तनातील गाठींची तपासणी, गर्भवती महिलांसाठी आयर्न सुक्रोज इंजेक्शनचे महत्त्व, स्तनपानाचे फायदे तसेच महिलांच्या विविध आरोग्य समस्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अनेक महिलांची प्राथमिक तपासणी करून आवश्यक रुग्णांना पुढील उपचारासाठी सल्ला देण्यात आला.

## सावदा येथे सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या 'बनाना सिटी चॅप्टर'चे दिमाखदार उद्घाटन;

### नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात

सावदा (प्रतिनिधी) : उद्योजकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि व्यावसायिक नेटवर्किंगला चालना देणाऱ्या सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट च्या 'सावदा बनाना सिटी सॅटेलाईट चॅप्टर'चे उद्घाटन व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ शनिवारी (दि. १) सावदा येथील कुलसुमाबाई मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सावदा व परिसरातील उद्योजकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे चेअरमन व मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. अजित मराठे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भंगाळे गोल्डचे संचालक भागवतदादा भंगाळे उपस्थित होते. तसेच ट्रस्टचे उडअ व्ही. पी. कुलकर्णी व डेप्युटी सेक्रेटरी जनरल अमोल पिंपळेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी नव्या कार्यकारिणीने अधिकृत पदभार स्वीकारला. डॉ. अजित मराठे यांच्या हस्ते ॲड. अमोल रामचंद्र चौधरी यांनी चेअरमन, अमोल पिंपळेकर यांच्या हस्ते गुणवंत नेमाडे यांनी सेक्रेटरी, तर व्ही. पी. कुलकर्णी यांच्या हस्ते ऋषिकेश सुनील पाटील यांनी ट्रेझरर म्हणून पदभार स्वीकारला.

याचवेळी चॅप्टरच्या संस्थापक सदस्यांचेही अधिकृत इन्स्टॉलेशन करण्यात आले. यामध्ये शेखर कासार, टेकचंद सरोदे, सागर प्रमोद पाटील, संतोष दत्तू निमगडे, प्रतीक अरुण होले, सागर कोष्टी, ओमप्रकाश महाजन, प्रफुल्ल भागवत पाटील, मंगेश एन. महाजन, मिलन अनिल महाजन, हितेश गोपाल सुपे, खिलचंद कांतीलाल बोंडे, गौरव अशोक भंगाळे, दिनेश सुरेश जावळे, तन्मय सतीश पाटील आणि सागर व्ही. पाटील यांचा समावेश आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजित मराठे यांनी '१०० उद्योजक - १०० कोटींची उलाढाल' हे सॅटर्डे क्लबचे ध्येय समोर ठेवून उद्योजकांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून व्यवसायाची उंची गाठावी, असे आवाहन केले. भागवतदादा भंगाळे यांनी स्थानिक उद्योजकांना व्यवसायवृद्धीसाठी मार्गदर्शन केले.

## जानकीबाई जनार्दन ठाकूर विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

आवरे प्रतिनिधी (सचिन पाटील)

आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त करत गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी केली.



कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गुरुचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. 'गु' म्हणजे अंधकार आणि 'रू' म्हणजे त्याचा नाश करणारा, अशी गुरुची व्याख्या सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील पहिले गुरु म्हणजे आई-वडील असून, त्यानंतर शिक्षणाच्या माध्यमातून योग्य दिशा देणारे शिक्षक हेच खरे मार्गदर्शक असल्याचे मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी सांगितले की, शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच जीवनातील अनेक महत्त्वाचे टप्पे यशस्वीपणे पार करता आले.

## राज्यभर गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याचे जाळे जळगावपर्यंत;

### २५९ संशयास्पद आयडी, चार जण अटकेत

जळगाव प्रतिनिधी : राज्यभर गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती आता जळगाव जिल्ह्यापर्यंत पोहोचली आहे. विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) तपासात जिल्ह्यातील २५९ संशयास्पद शालार्थ आयडी आढळून आले असून, त्यापैकी एका संस्थेतील १७७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीसाठी बनावट प्रस्ताव सादर करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात आतापर्यंत चार जणांना अटक करण्यात आली आहे.

तपासात अटकेतील संजय गरुड यांच्या संस्थेतील १७७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीचे प्रस्ताव बनावट असल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक पोलिसांच्या पथकाने शेंदुर्णी येथील संबंधित संस्थांवर भेट देत महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली. जिल्ह्यात सर्वाधिक संशयास्पद शालार्थ आयडी याच संस्थेशी संबंधित असल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणात संस्थेचे सहसचिव दीपक गरुड (५२, रा. पारसनगर, शेंदुर्णी) याला तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शिरपूर (जि. धुळे) येथे शोधून पोलिसांनी अटक केली. तसेच सोपान सुपडू बारी (५२), पंकज माधवराव चव्हाण (४२) आणि राजवीर दीपक गरुड (१८) यांनी मुख्य आरोपीला अटक टाळण्यासाठी आश्रय दिल्याचा आरोप असल्याने त्यांनाही अटक करण्यात आली आहे.

एसआयटीच्या तपासात आणखी धक्कादायक बाब समोर आली असून, जिल्ह्यातील २५९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसतानाही बनावट मान्यता देण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याशिवाय पाचोरा, पारोळा, अमळनेर आणि चाळीसगाव तालुक्यातील संस्थांमधील उर्वरित ८२ शालार्थ आयडीही संशयाच्या भोवऱ्यात असून, त्यांचा तपास सुरू आहे. संबंधित संस्थांकडील आवश्यक कागदपत्रे एसआयटीने ताब्यात घेतली आहेत.दरम्यान, या कारवाईनंतर तत्कालीन माध्यमिक शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांमध्येही धास्ती निर्माण झाल्याची चर्चा आहे. काही अधिकाऱ्यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतल्याचेही समजते.

राजकीय वर्तुळातही चर्चा

या प्रकरणातील मुख्य आरोपी संजय गरुड हे भाजपचे नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय मानले जात असल्याने या घोटाळ्याला राजकीय रंगही चढला असून, त्यांच्या पूर्वीच्या राजकीय संबंधांची चर्चा सुरू झाली आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त निष्कलंकी धामात भक्तिमय उत्सव;

### गोशाळेला नाडीपत्ती जातीच्या दोन गायींचे दान

सावदा प्रतिनिधी-

यावल तालुक्यातील वढोदा येथील निष्कलंकी धामात सतपंथ मंदिर संस्थानतर्फे गुरुपौर्णिमा महोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. यावेळी सतपंथ चॅरिटेबल ट्रस्ट संचलित नीलकंठ जगन्नाथ गोशाळेसाठी सुरत येथील विलासभाई पटेल यांच्या परिवाराने नाडीपत्ती जातीच्या दोन गायी दान देत गोसेवेचा आदर्श घालून दिला.




महोत्सवाच्या प्रारंभी नरेंद्रभाई व सीमाबेन तसेच विलासभाई व जिनूबेन भीमपोर (सुरत) यांनी गुरुपाद्यपूजन केले. एकदंत महाराजांचे पूजन किशोर मोरे व भालचंद्र सोनवणे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर गोशाळेला दोन गायींचे दान करण्यात आले. तुलसी हेल्थकेअरमध्ये सेवेकरी म्हणून कार्य करणाऱ्या महिलांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

महामंडलेश्वर सतपंथरत्न श्री जनार्दन हरीजी महाराज यांनी आशीर्वचनात सांगितले की, स्वत:च्या कल्याणापेक्षा समाजकल्याणाचा विचार करणारे भक्त गुरूंना अधिक प्रिय असतात. गुरुबोध हा भगवंताच्या अनुभूतीसाठी असून, गुरूंच्या विचारांचे आचरण केल्यास जीवन सार्थक होते. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून सातत्याने नामस्मरण करावे.

यावेळी पंडित डॉ. श्रीकांत रत्नपारखी यांना नीती आयोग, एमसीए भारत सरकार आणि वेदसाधना अध्ययन केंद्र, नवी दिल्ली यांच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या 'विद्यावाचस्पती' पदवीबद्दल जनार्दन हरीजी महाराजांच्या हस्ते विशेष सन्मानित करण्यात आले.

गुरुपौर्णिमेनिमित्त संजीवनी ब्लड बँकेच्या सहकार्याने सतपंथ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच सतपंथ चॅरिटेबल ट्रस्ट व नोबेल फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या 'सतपंथ शिष्यवृत्ती महाअभियान' या उपक्रमाची माहिती जयदीप पाटील यांनी दिली. शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत गुरुदेवांनी दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



भुसावळ (प्रतिनिधी): श्री र. न. मेहता हिंदी प्राथमिक विद्यामंदिर, भुसावळ येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य व विचारांवर मनोगते व्यक्त करून उपस्थितांना माहिती दिली. शिक्षक रवींद्र पाटील, सचिन चौधरी, शिरीष कोल्हे, घनश्याम फिरके आणि शीतल इंगळे यांनी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रकार्याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मुख्याध्यापिका सौ. रिता शर्मा यांनी विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार आत्मसात करून त्यानुसार आचरण करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रींचे दर्शनाकरीता भाविकांची गर्दी.



उरण: सुनिल ठाकूर

रविवार दि.०२ ऑगस्ट २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थी व रविवारची शासकीय सुट्टी तसेच पावसामुळे सुरु झालेले धबधबे व निसर्गरम्य वातावरणामुळे भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.